# चित्रपटगृहाची तपासणी

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, कलम ८ अन्वये शासनास मिळणाऱ्या महसूलाचा भरणा योग्य रितीने केला जातो की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ज्या महसूल अधिकारी/ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येते त्याच अधिकाऱ्यांना करमणूक केंद्राची तपासणी करता येते. अन्य व्यक्तीने केलेली तपासणी कायद्याने ग्राह्य धरली जात नाही.

## **तिकीट काऊंटर्सचे प्रकार:**

- 'ए' काऊंटर म्हणजे तिकिट पुस्तकाची स्थळ प्रत;
- 'पी' काऊंटर म्हणजे तिकिटाचा प्रेक्षकाकडे असणारा भाग;
- 'डी' काऊंटर म्हणजे तिकिटाचा डोअर कीपरकडे असणारा भाग.

## **चित्रपटगृहाची तपासणी केव्हा करावी:**

- एखादा नवीन चित्रपट प्रदर्शित होतो तेव्हा पहिल्या आठवड्यात सर्व खेळांची तपासणी जरूर करावी.
- जिल्हयात जर एखादा चित्रपट एकेठिकाणी हाऊसफुल जात असेल आणि दुसरा चित्रपटगृह, त्याच चित्रपटासाठी ५०% किंवा कमी प्रेक्षक उपस्थिती दर्शवत असेल तर जरूर तपासणी करावी.
- बाजार/यात्रा/सुट्टीचा काळ/पगाराचा दिवस यावेळी सर्व खेळांची तपासणी करावी. या दिवसांत पूर्वपरवानगीशिवाय जादा खेळ किंवा अनुज्ञेय आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रेक्षक बसवणे असे प्रकार घडतात. त्यासाठी कलम ५ अन्वये चित्रपटगृह मालक फौजदारी कारवाईस पात्र ठरतो.
- काही वेळेस करमणूक कर माफ असणाऱ्या चित्रपटाचा फलक बाहेर लावलेला असतो परंतु प्रत्यक्षात वेगळाच चित्रपट दाखवला जात असतो. म्हणून करमणूक कर माफ असणाऱ्या चित्रपटगाची तपासणी करावी.
- करमणूक शुल्क योग्य दराने भरले की नाही हे दैनिक तिकिट विक्री नोंदवही (डी.सी.आर.) व 'ब' विवरणपत्र तपासुन कळू शकते.

## **चित्रपटगृहाची अचानक तपासणी कशी करावी:**

- चित्रपट सुरू झाल्यानंतर अंदाजे अर्धा तासानंतर किमान तीन, अव्वल कारकुनापेक्षा कमी दर्जा नसणारे कर्मचारी घेऊन चित्रपटगृहात प्रवेश करावा.
- प्रथम बुकिंग कार्यालयात जाऊन प्रत्येक वर्गाची त्या खेळाची तिकिटे ताब्यात घ्यावी.
- डोअर कीपरकडून त्याने दरवाज्यावर घेतलेले सर्व 'डी' पासेस ताब्यात घ्यावे.
- तिकिट विक्रीबाबतचा लिहिलेला डी.सी.आर. ताब्यात घ्यावा.
- प्रेक्षकगृहात जाऊन प्रेक्षकांची संख्या तपासावी.
- काही प्रेक्षकांकडून 'पी' पासेस ताब्यात घ्यावे व 'डी' पासेस सोबत त्यांच्या क्रमांकाची पडताळणी करावी.
- तिकिट पुस्तकातील तिकिटांची प्रत्यक्ष विक्री, डी.सी.आर. मध्ये दर्शवलेली विक्री, प्रेक्षकगृहातील प्रेक्षकांची संख्या यांचा वर्गवार मेळ घ्यावा.
- काही तफावत आढळल्यास ते व्यवस्थापकाच्या निदर्शनास आणून त्याचा जबाब घ्यावा.

Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ काही ठिकाणी 'पी' काऊंटरचे दोनपेक्षा जास्त तुकडे करून ते मंजूर तिकिट म्हणून प्रेक्षकांना देण्यात येतात तर काही ठिकाणी तिकिटांऐवजी प्रेक्षकांच्या हातावर रबरी शिक्के मारणे, सायकल स्टँडची तिकिटे देणे, कँटीनचे पास देणे असे प्रकार चालतात. हा कलम ४-ब अन्वये दंडनिय अपराध आहे व यासाठी चित्रपटगृह मालक कलम ५ अन्वये फौजदारी कारवाईस पात्र ठरतो. यावेळेस चित्रपटगृहातील प्रत्येक प्रेक्षकाला अधिकृत तिकिट मिळाल्याची खात्री करावी.

♦ चित्रपटगृह समांतर तिकिट मालिका चालवत असल्याचा संशय असल्यास प्रथम मंजूर तिकिट पुस्तक व अनधिकृत तिकिट पुस्तक त्रयस्थ पंचाच्या उपस्थितीत जप्त करावे. प्रेक्षकांना असे तिकिट दिले असल्यास अशा प्रेक्षकांचा जबाब त्रयस्थ पंचाच्या उपस्थितीत नोंदवावा. त्यानंतर आवश्यकतेनुसार परवाना अल्पकाळासाठी निलंबित करावा. परवाना प्राधिकारी पोलीस आयुक्त असल्यास, करमणूक कर अधिनियमातील कलम ९३ अन्वये त्यांना परवाना अल्पकाळासाठी निलंबित करण्याची विनंती करावी. चुकवलेले करमणूक शुल्क कलम ४-ब अन्वये कारवाई करून निश्चित करावे. हे शुल्क रु. २५,०००/- पेक्षा जास्त असल्यास सक्षम न्यायालयात कॅव्हेट दाखल करावे. चित्रपटगृह मालक तडजोडीसाठी तयार असल्यास त्यची लेखी विनंती घेऊन कलम ९-अ अन्वये तडजोडीचे आदेश पारित करावे अन्यथा चित्रपटगृह मालकाविरूध्द कलम ५ अन्वये फौजदारी कारवाई करावी.

♦ उपरोक्त तपासण्यांसाठी अव्वल कारकुनापेक्षा कमी दर्जाचा कर्मचारी प्राधिकृत करू नये.

♦ करमणूक शुल्काची रक्कम विहित कालावधीत न भरल्यास कलम ९ अन्वये सदर थकीत रक्कम महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येते.

♦ चित्रपटगृह मालकाची आयकर विवरणपत्रे कलम ४ ब अन्वये प्राप्त करवून घेऊन त्याने विवरणपत्रात दर्शवलेले तिकिट विक्री तसेच सेवाशुल्कापासून मिळणारे उत्पन्न तपासावे. ते जर करमणूक कर रेकॉर्डपेक्षा जास्त असेल तर कलम ४ ब अन्वये चुकवलेल्या करमणूक कराचे निर्धारण करावे.

♦ सेवा शुल्क, जर अखर्चित रकमेवर किंवा अनुज्ञेय नसलेल्या प्रयोजनांवर खर्च केला असेल किंवा सेवा शुल्क विनियोग हिशोब ३० सप्टेंबर पूर्वी सादर केला नसेल तर सदर रक्कम अनुज्ञेय प्रयोजनांवर खर्च न करता स्वत:कडे ठेवली असे गृहित धरून कलम ४-ब अन्वये करमणूक शुल्क आकारता येते.

**○ <u>चित्रपटगृह तपासणीत खालील दोष आढळल्यास दंडात्मक कारवाई करता येते</u>**:

♦ तिकिट विक्री पुस्तके सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करून न घेणे.
♦ तिकिट विक्री केलेल्या तिकिटांवर विक्री दिनांकाचे शिक्के नसल्यास.
♦ संपूर्ण तिकिट विक्रीनंतर शेवटच्या तिकिटावर 'बंद' असा शेरा लिहून स्वाक्षरी न केल्यास.
♦ डी.सी.आर. मध्ये खाडाखोड असल्यास.
♦ खेळ सुरू झाल्यानंतर एका तासानंतरही डी.सी.आर. न लिहील्यास.
♦ चित्रपटगृहात पूर्वी झालेल्या खेळाचे 'डी' पासेस आढळून आल्यास.
♦ प्रेक्षकगृहात विनातिकिट प्रेक्षक आढळून आल्यास.
♦ करमुक्त चित्रपट दाखवत असतांना विक्री केलेल्या तिकिटांवर करमुक्त दराचे शिक्के नसल्यास.
♦ करमणूक कराचा भरणा विहीत मुदतीत न केल्यास. (चलन/पावती पाहणे)


Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ करमणूक कर आकारणीचा साप्ताहिक 'ब पत्रक' अहवाल कार्यालयात मुदतीत न सादर केल्यास.

♦ मंजूर तिकिट दरापेक्षा प्रेक्षकांकडून जादा दर आकारल्यास. (अशा प्रेक्षकांचे जबाब नोंदवावे.)

♦ चित्रपटगृहात दाखवण्यात येणाऱ्या जाहिरातींबाबत करारनामा केला नसल्यास तसेच त्याबाबत कर भरला नसल्यास.

♦ चित्रपटगृहाच्या 'इ', 'एफ' व '४(२)बी' परवान्याचे नूतनीकरण केले नसल्यास.

आढळलेले दोष क्रमाने नोंदवून ते मान्य असल्याबाबत व्यवस्थापकाचा जबाब व स्वाक्षरी घ्यावी.

**○ <u>मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील महत्वाची कलमे:</u>**

♦ कलम- ३: विविध प्रकारच्या करमणूक केंद्रावर प्रवेशासाठी शुल्क दर किती असेल याची तरतूद.

♦ कलम- ४: करमणूक केंद्र चालकाने करमणूक शुल्क भरणा केल्याचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे अशी तरतूद.

♦ कलम- ५: करमणूक केंद्र चालकाने करमणूक शुल्क भरण्यासाठी टाळाटाळ केली तर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद.

♦ कलम- ६: कोणत्या करमणूक कार्यक्रमावर करमणूक शुल्काची माफी देण्याचे अधिकार.

♦ कलम- ८: करमणूक केंद्र तपासणीचे अधिकार प्रदान करण्याची तरतूद.

♦ कलम- ९: करमणूक केंद्र चालकाने फसवेगिरी केल्यास तसेच विहित मुदतीत करमणूक शुल्क न भरल्यास दंड आणि व्याजाची तरतूद. (कलम-९ अन्वये झालेल्या आदेशावर अपिलाची तरतूद कलम- १० अन्वये आहे)

♦ करमणूक केंद्र सुरू करण्याची पूर्व सूचना न दिल्यास कलम ५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करता येतो किंवा कलम ९(अ)१(अ) अन्वये करमणूक केंद्र सुरू झाल्याच्या दिनांकापासून करमणूक शुल्काची रक्कम आणि या रकमेच्या दुप्पट दंड अशी रक्कम वसूल करता येते.

♦ तिकिट विक्रीचा हिशोब तिकिट विक्री नोंदवहीत न लिहिल्यास कलम ९(अ)१ (ब) अन्वये किमान रुपये ५००/- व कमाल रुपये २०००/- दंड करता येतो.

♦ विक्री केल्याजाणाऱ्या तिकिटांच्या तिन्ही भागांवर तिकिट विक्रीच्या दिवसाच्या तारखेचा शिक्का न मारल्यास मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९५८, नियम ११५ चा भंग होतो आणि मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, कलम ९(अ)१ (ब) अन्वये किमान रुपये ५००/- व कमाल रुपये २०००/- दंड करता येतो.

♦ तिकिट विक्री पूर्ण बंद झाल्यावर शेवटच्या तिकिटावर 'बंद' असा शेरा मारुन स्वाक्षरी न केल्यास ९(अ)१ (ब) अन्वये किमान रुपये ५००/- व कमाल रुपये २०००/- दंड करता येतो.

♦ करमणूक शुल्क माफी असलेल्या कार्यक्रमासाठी प्रेक्षकांकडून करमणूक शुल्क वसूल केल्यास कलम ९(अ)१ (अ) अन्वये करमणूक केंद्र सुरू झाल्याच्या दिनांकापासून करमणूक शुल्काची रक्कम आणि या रकमेच्या दुप्पट दंड अशी रक्कम वसूल करता येते.

♦ प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तिकिटे व नोंदवह्या मंजूर करुन न घेता वापरल्यास कलम ९(अ)१ (ब) अन्वये किमान रुपये ५००/- व कमाल रुपये २०००/- दंड करता येतो.

♦ मंजूर तिकिटे न वापरता बोगस तिकिटे वापरल्यास कलम ५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करता येतो किंवा कलम ९(अ)१ (अ) अन्वये करमणूक केंद्र सुरू झाल्याच्या दिनांकापासून करमणूक शुल्काची रक्कम आणि या रकमेच्या दुप्पट दंड अशी रक्कम वसूल करता येते. तसेच कलम ९(ड) अन्वये परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव पाठवता येतो. करमणूक शुल्काचा भरणा विहित मुदतीत न केल्यास कलम ९(ब) अन्वये व्याज आकारता येतो.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९५८, नियम ११५ अन्वये करमणूक केंद्रावर विक्री केल्याजाणाऱ्या तिकिटांच्या तिन्ही भागांवर तिकिट विक्रीच्या दिवसाच्या तारखेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

♦ महाराष्ट्र सिनेमा नियम १९६६ अन्वये करमणूक केंद्रावर मालक किंवा व्यवस्थापक यांनी हजर असणे आवश्यक आहे.

♦ मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, कलम ८ अन्वये करमणूक केंद्राची तपासणी करण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी नियुक्त करण्यात येतात.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector